महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १४२ वा | दिनांक : २७/०२/२०२५ | वार : गुरूवार

## मुख्यमंत्र्यांनी बोलावलेल्या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्री गैरहजर



**मुंबई :** गेल्या दोन दिवसांपासून फिक्सर ओएसडी व पीएवरुन महायुतीमधील घटक पक्षाकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले जात असल्याचे दिसत आहे. त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २०२७ च्या नाशिक कुंभ मेळ्यासाठी बैठक पार पडली. मात्र, या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार दोघेही उपस्थित नव्हते. त्यामुळे महायुतीमध्ये नाराजी असल्याचे बोलले जात आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील काही दिवसांपूर्वी कुंभमेळ्याच्या तयारीसाठी बैठक घेतली होती. आता देवेंद्र फडणवीस यांनी देखील बैठक घेतली. मात्र देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या या बैठकीला दोन्ही उपमुख्यमंत्री गैरहजर होते. काही आठवड्यांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंत्रालयात सोशल वॉररूमची बैठक पार पडली होती. या बैठकीला सगळे उपस्थित असणे अपेक्षित असताना एकनाथ शिंदे उपस्थित नव्हते. असे असले तरी या नाराजीमागचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

सह्याद्री येथे पार पडलेल्या एका महत्त्वाच्या बैठकीला देखील एकनाथ शिंदे यांच्यासह अजित पवार हे दोन्हीही उपमुख्यमंत्री उपस्थित नव्हते. त्यात आता गेल्या दोन दिवसांपासून फिक्सर ओएसडी व पीएवरुन महयुतीमधील घटक पक्षाकडून एकमेकावर आरोप-प्रत्यारोप केले जात असल्याने वातावरण तापले आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्र्यांच्या ओएसडी आणि स्वीय सहायक यांच्याविषयी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. तसेच मंत्रालयातील फिक्सर आणि दलालांना यापुढे मंत्र्यांचे ओएसडी आणि स्वीय सहायक म्हणून स्थान नसणार असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

## 'शक्ती' कायदा किती काळ केंद्र-राज्याच्या साखळदंडात अडकलेला राहणार? : अंबादास दानवे



**छत्रपती संभाजीनगर :** पुण्यातील स्वारगेट बसस्टँड परिसरात उभ्या असलेल्या एका शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याची संतापजनक घटना घडली आहे. या संदर्भात विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी देवेंद्र फडणवीस सरकारवर टीका केली. शक्ती कायदा किती काळ केंद्र आणि राज्य सरकारच्या साखळदंडात अडकलेला राहणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. राज्यातील सरकार महिलांना सुरक्षा देण्यासाठी नाही तर कशासाठी आहे? असा सवालही त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला आहे.

या संदर्भात विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी एका पोस्टच्या माध्यमातून सरकारवर निशाणा साधला आहे. यामध्ये ते म्हणाले की, 'पुण्यातील महिलेला बसमध्ये नेऊन घडलेली अत्याचाराची घटना भयंकर आहे. मुळात अश्या घटनांमध्ये आतात्याने वाढ होत असताना 'शक्ती' कायदा अजून किती काळ केंद्र-राज्याच्या प्रश्नोत्तराच्या साखळदंडात अडकलेला राहणार आहे? हा कायदा अस्तित्वात न आणून सरकार काय साध्य करू पाहत आहे? महिलांना सुरक्षा देण्यासाठी सरकार नाही तर मग कशासाठी आहे देवेंद्र फडणवीस जी? '

पुण्यातील स्वारगेट बसस्टँड परिसरात उभ्या असलेल्या एका शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याची संतापजनक घटना उजेडात आली आहे. पहाटे ५.३० च्या सुमारास ही घटना घडली. ती दुपारी समोर आली. या घटनेमुळे पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रात एकच खळबळ माजली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, पीडित तरुणी पुण्याहून फलटणला जात होती. ती पहाटे स्वारगेट बसस्थानकावर थांबली होती. तेव्हा एका अनोळखी व्यक्तीने तिची बस दुसऱ्या ठिकाणी थांबल्याचे सांगितले. पण तरुणीने त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. त्यावर तरुणीने तिच्या एकटेपणाचा फायदा घेत तिला विश्वासात घेतले. त्यानंतर तो तिला जवळच उभ्या असलेल्या एका शिवशाही बसमध्ये नेले. तिथे त्याने तिच्यावर पाशवी बलात्कार केला व तेथून पळ काढला.




## देवेंद्र फडणवीसांनी सक्षम व्यक्तीकडे गृहमंत्रीपद द्यावे : खासदार वर्षा गायकवाड



**मुंबई :** पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात शिवशाही बसमध्ये एका तरुणीवर बलात्काराची घटना होते ही पुण्यासह महाराष्ट्राच्या नावाला काळीमा फासणारी घटना आहे. मुंबई, पुणे सारख्या शहरात महिला बलात्काराची घटना घडणे हे अत्यंत दुर्दैवी आहे. या घटनेची गंभीर दखल घेऊन आरोपीवर कठोर कारवाई केलीच पाहिजे पण राज्यात गृहविभागाचा कारभार अत्यंत सुमार आहे, गृहमंत्री म्हणून फडणवीस या विभागाला न्याय देऊ शकत नाहीत, त्यांनी गृह मंत्रीपद सोडावे, अशी मागणी मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केली आहे.

यासंदर्भात प्रतिक्रीया देताना खासदार वर्षा गायकवाड पुढे म्हणाल्या की, महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था अत्यंत बिकट बनलेली आहे. महिला सुरक्षा हा चिंतेचा विषय बनला आहे. पुणे, मुंबई ही शहरे महिलांसाठी सुरक्षित मानली जात असत पण मागील काही वर्षात या दोन्ही शहरात गुन्हेगारी प्रचंड वाढलेली आहे. पुणे हे विद्येचे माहेरघर ही ओळख कधीच पुसली गेली असून पुणे आता ड्रग्जचे हब, गुन्हेगारी टोळ्यांचे शहर अशी ओळख निर्माण झाली आहे. पहाटे पाच-सहा वाजता शिवशाही बसमध्ये तरुणीवर बलात्कार होतो हे एसटी महामंडळ, स्वारगेट स्थानक व पुणे पोलिसांच्या बेफिकीर कारभाराचे उदाहरण आहे. क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यात एका तरुणीवर बलात्कार होतो हे आपल्याला लाज वाटावी अशी घटना आहे.

महा विकास आघाडी सरकारने महिलांसाठी शक्ती कायदा बनवून केंद्र सरकारकडे पाठवला पण अजून त्या कायद्याला मान्यता देण्यात आलेली नाही. महिला अत्याचाराची घटना घडल्यानंतर त्याच्यावर चर्चा होते पण महिलांवरील अत्याचार कमी करण्यावर भर दिला जात नाही. भाजपा सरकारच्या काळात तर महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झालेली आहे. ज्या लाडक्या बहिणींच्या मतांवर सत्तेत आले त्यांनी लाडक्या बहिणींच्या सुरक्षेची जबाबदारीही घेतली पाहिजे, असेही खासदार वर्षा गायकवाड म्हणाल्या.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ फेब्रुवारी २०२५


## बसवराज पाटील यांच्या हस्ते बसवराज पेट्रोलियमचे उद्घाटन.....



**मुरूम, ता. २५ (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** देशाला अधिक समृद्ध करण्यासाठी तरुणांनी नवनवीन व्यवसायाकडे वळले पाहिजे. त्यामुळे स्वतःच्या प्रगती बरोबरच देशाची ही प्रगती होते.

सध्या पेट्रोल, डिझेल हे अत्यावश्यक झाल्याचे प्रतिपादन उद्घाटन प्रसंगी माजी राज्यमंत्री बसवराज पाटील यांनी केले. मुरूम ता. उमरगा येथे भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेडचे बसवराज पेट्रोलियम या पेट्रोल पंपाचे उद्घाटन बसवराज पाटील यांच्या हस्ते सोमवारी (ता. २४) रोजी करण्यात आले.

यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, सोलापूरचे सीनियर सेल्स मॅनेजर शाश्वत शर्मा, संस्कार गुप्ता, लोहारा पंचायत समितीचे माजी सभापती विश्वनाथ पत्रिके, माजी नगराध्यक्ष रशीद शेख, सचिन राजनाळे, विश्वनाथ मुदकण्णा, अंकुश पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना बसवराज पाटील म्हणाले की, मुरूम हे शहर राष्ट्रीय महामार्गालगत आहे.

त्यामुळे येथे दुचाकी, चार चाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या व्यवसायामुळे इथल्या ग्राहकांची सेवाच होणार आहे. हा व्यवसाय करताना आपण त्यात शुद्धता टिकवून ठेवणे आवश्यक आहे. या भागात शेतकरी वर्ग मोठा असून शेतीतील बरीचशी कामे यंत्राद्वारे, ट्रॅक्टरच्या माध्यमातून केली जातात. त्यामुळे शेतकऱ्यांनाही एक प्रकारे मदत या पेट्रोल पंपाच्या माध्यमातून होईल.

पंचायत समितीचे माजी सभापती मदन पाटील, डॉ. नितीन डागा, शरणाप्पा मंगरूळे, श्रीशैल मंगरूळे, अजय औसेकर, प्राचार्य अशोक सपाटे, दत्ता चटगे, राजशेखर मुदकण्णा, संतोष चटगे आदि उपस्थित होते.

किरण बरबडे, ओमकार पाटील, नाना बेंडकाळे, गणेश काबरा, गणेश अंबर, गुरु स्वामी, शरण बेळमगे, महेश पाटील, श्रीहरी पाटील, महादेव मेणसे व बरबडे परिवारातील सर्व सदस्यांनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरज बरबडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुभाष हुलपल्ले तर आभार शितल राजनाळे यांनी मानले.

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जेईएस मध्ये कवयित्रींचे कवी संमेलन

***जालना (प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे) :** मराठी भाषा समिती जालना व जेईएस महाविद्यालय जालनाच्या मराठी विभागातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त, 'काव्यधारा' महिला कवयित्रींचे संमेलनाचे आयोजन दि.२७ फेब्रुवारी २०२५ गुरुवार, रोजी सकाळी १०.३० वाजता, जेईएस महाविद्यालयात आयोजन करण्यात आले आहे.

या कवी संमेलनाचे उद्घाटन जालनाच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती नम्रता चाटे या करणार असून, प्रमुख अतिथी म्हणून उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री असतील.

या कवयित्रींच्या कवीसंमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध कवयित्री तथा जालनाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल तुपे असून, छत्रपती संभाजी नगर येथील जेष्ठ कवयित्री प्रिया धारूरकर, जालनातील ज्येष्ठ सुप्रसिद्ध कवयित्री संजीवनी तळेगावकर, रेखा गतखने, वैशाली फोके,कविता नरवडे, रत्नमाला मोहिते, आरती सदावर्ते व सत्यशीला तोर आदि कवयित्री आपल्या दर्जेदार काव्यरचना सादर करणार आहेत.

जालना शहरातील काव्यप्रेमी रसिक ,विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षकांनी उपस्थित राहावे असे आव्हान मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. यशवंत सोनुने व मराठी भाषा समितीचे सदस्य प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी केले आहे.






## श्री संत जनार्दन स्वामी विद्यालय (गुरुकुल) वेरूळ येथे वार्षिक स्नेहसंमेलन, पालक मेळावा व आशीर्वाद समारंभ मोठ्या उत्साहात साजरा



**खुलताबाद :- ( प्रा. योगेश रावते ) :** दि.२५ वेरूळ येथील श्री संत जनार्दन स्वामी प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (गुरुकुल) वेरूळ मध्ये जगद्गुरु जनार्दन स्वामी यांच्या कृपाशीर्वादाने तसेच त्यांचे उत्तराधिकारी तथा संस्था अध्यक्ष जगद्गुरु स्वामी श्री शांतिगिरीजी महाराज यांच्या प्रेरनेने व संस्थेचे सचिव महंत १०८श्री श्री स्वामी सेवागिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत वार्षिक स्नेहसंमेलन, माजी विद्यार्थी मेळावा, पालक मेळावा व आशीर्वाद समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

याप्रसंगी सर्व आश्रमीय संत उपस्थित होते, तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीक्षेत्र ऋषिकेश देवभूमी उत्तराखंड येथील श्री प्रवीणजी पटेल, श्री हितेश नारखेडे यांच्यासह महंत अमर महाराज, महंत अविरदास महाराज, महंत नामदेव महाराज, महंत रामदास हरणे महाराज यांच्यासह संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री.काकासाहेब गोरे,गुरुकुल विकास समितीचे श्री अंकुशजी जाधव गुरुजी, श्री जे. के.चव्हाण गुरुजी,यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी छत्रपती संभाजीनगरचे अप्पर पोलीस अधीक्षक श्री सुनील लांजेकर यांनीही भेट दिली. याप्रसंगी कार्यालयातील हॉलमध्ये पालक मेळावा घेण्यात आला अनेक पालक प्रतिनिधींनी आपले मनोगते व्यक्त केले व सध्या असलेल्या व्यवस्थेबद्दल व सुविधेबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच पुढील वर्षी वसतिगृहाच्या नियोजनासंदर्भात चर्चा करण्यात आली.यानंतर माजी विद्यार्थी मेळावा घेण्यात आला.

यावेळी अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते. बाबाजींच्या संकल्पित समाधी मंदिरापासून श्री संत जनार्दन स्वामी संस्कार भवना पर्यंत ढोल ताशाच्या गजरात नाचत, बाबाजींच्या जयघोषात पालखीची मिरवणूक कढण्यात आली. यावेळी फटाक्यांच्या आतिषबाजीने विशेष लक्ष वेधले. आशीर्वाद समारंभात जगद्गुरु जनार्दन स्वामी यांच्या पालखी पूजनसह स्वामी शांतिगिरीजी महाराज यांचे पाद्यपूजन करून दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छासह आशीर्वाद दिले.विद्यार्थ्यांच्या हस्ते बाबाजींचे पाद्यपूजन करण्यात आले.

दरवर्षी महाशिवरात्रीच्या आदल्या दिवशी स्नेहसंमेलनात आजीवन अन्नदान पंगतीचा संकल्प करणाऱ्या सन २००६ च्या बॅच चा सत्कार करण्यात आला. स्नेहसंमेलना प्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी बाबाजींच्या जीवनावर आधारित प्रसंग,गीत, देशभक्ती गीत यांसह विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात केले. उपस्थित सर्व पालक व विद्यार्थ्यांना श्री क्षेत्र प्रयागराज (उत्तर प्रदेश ) येथे जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या पट्टाभिषेक सोहळ्याची चित्रफित दाखवण्यात आली.

शेवटी जगद्गुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी आशीर्वादपर मार्गदर्शन करताना महाशिवरात्र व शिवभक्तीचा महिमा सांगितला व आपल्या पाल्यांना संस्कारक्षम बनवण्यासाठी गुरुकुलात प्रवेश घेण्याचे आवाहन केले व शेवटी सर्व विद्यार्थ्यांचे,गुरुजनांचे उत्कृष्ट आयोजनाबद्दल कौतुक केले.

याप्रसंगी श्री गणेशजी नरोडे व त्यांच्या टीमची सुंदर अशी भक्ती गीतांची मैफिल रंगली होती. यावेळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री.व्ही. यू.बोरसे,प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती एम.एस.ताले यांच्यासह प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक श्री.बी. के.अधाने गुरुजी यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ फेब्रुवारी २०२५


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास सेंटर ऑफ एक्सलन्स प्रमाणपत्र व प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांना उत्कृष्ट जिल्हा समन्वयक पुरस्कार प्राप्त





**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** महाराष्ट्र राज्य उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा अंतर्गत महाराष्ट्रातील ५० महाविद्यालयांना सेंटर ऑफ एक्सलन्स म्हणून प्रमाणित करण्यात आले.

महाविद्यालयाच्या सेंटर ऑफ एक्सलन्स चे प्रमाणपत्र आणि निधीतसेच २०२४-२५ चा श्री छत्रपती संभाजीनगर विभागातील उत्कृष्ट जिल्हा समन्वयक पुरस्कार प्राचार्य डॉ संजय अस्वले यांना मा. प्रफुल्ल पाठक, सेक्रेटरी पॉवर सेक्टर स्किल दिल्ली, मा बाबासाहेब वाघमारे लायझनिंग ऑफिसर, ऊर्जा विभाग मंत्रालय, मा राज देशमुख, संस्थापक वुई फाउंडेशन, सिंघानिया कंपनीचे सीआयओ, मा. शंकर जाधव, प्रीआयएस सेंटर मुंबई संचालिका मा.भावना पाटोळे, पोलीस आयुक्त निलेश घटे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर सभागृहामध्ये आयोजित करिअर कट्टा एकदिवसीय कार्यशाळा आणि राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा २५ फेब्रुवारी रोजी संपन्न झाला.

या कार्यक्रमात या कार्यशाळेसाठी व पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी महाराष्ट्र राज्याची उद्योग मंत्री ना उदयजी सामंत यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केलेयावेळी करिअर कट्टा प्रमुख मा. यशवंत शितोळे, आवाजाची कार्यशाळा चे मा. सोनाली लोहार, इमोशनल इंटेलिजन्स च्या मा. मिथिला दळवी मा. प्राचार्य प्रज्ञा प्रभू, मा. प्राचार्य अतुल साळुंखे, मा. डॉ दीपा वर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती.

येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयास करिअर कट्ट्याच्या वतीने गेली तीन वर्षे सेंटर ऑफ एक्सलन्स प्रदान करण्यात आले आहे. गतवर्षी या सेंटर ऑफ एक्सलन्स बी ग्रेड होता यावर्षी महाविद्यालयाने करिअर कट्ट्याच्या माध्यमातून केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल ए प्लस दर्जा देऊन सन्मान केला आहे.

त्याचबरोबर महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात धाराशिव जिल्ह्याचे जिल्हा समन्वयक म्हणून करिअर कट्ट्याच उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल संपूर्ण श्री छत्रपती संभाजी नगर विभागातून उत्कृष्ट जिल्हा समन्वयक म्हणून पुरस्काराने सन्मान मुंबई येथील विशेष कार्यक्रमात करण्यात आला आहे.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल आणि डॉ. अस्वले यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.अमोल शिवाजीराव मोरे, उपाध्यक्ष मा.आश्लेष शिवाजीराव मोरे, सरचिटणीस मा.जनार्दन साठे, सचिव मा.पद्माकरराव हराळकर, सहसचिव मा.डॉक्टर सुभाष वाघमोडे, आणि सर्व संचालक मंडळ, उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ पद्माकर पिटले, उपप्राचार्य प्रा जी एस मोरे, पर्यवेक्षक प्रा शैलेश महामुनी, प्रबंधक राजकुमार सोनवणे, कार्यालयीन अधीक्षक नितीन कोराळे, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.






## मराठी आमची मायबोली



ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य कुसुमाग्रज म्हणजे वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस " मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा केला जातो. कुसुमाग्रजांनी मराठी भाषेला कथा, कविता, कादंबरी, ललित लेखन च्या माध्यमातून एक उंची प्राप्त करून दिली आहे. सामान्यातल्या सामान्य माणसाच्या मनात तिच्याविषयी आदर निर्माण केला. सामान्यातल्या सामान्य माणसाच्या व्यथा, वेदनांना त्यांनी त्यांच्या भाषेत मोकळी वाट करून दिली.

कुसुमाग्रजांनी आपल्या लेखनीतून सामाजिक अन्याय, सामाजिक विषमता यावर कडाडून हल्ला चढविला. लेखनी चालवता चालवता ते सामाजिक चळवळीतही सहभाग घ्यायचे त्यामुळे त्यांच्या लेखनातील भाषेला एक धार यायची. तेज चढायचे. त्यांच्यात असणाऱ्या शोधक, चिकित्सक, समाजनिष्ठ दृष्टीने त्यांचे साहित्य समाजमनात रूजायचे.

भाषा ही मानवी जीवनाचा अविभाज्य असा एक भाग आहे. आपल्या मनातील भावना, विचार, अनुभव व्यक्त करण्यासाठी प्रत्येकाला भाषेचा उपयोग करावाच लागतो. मानव नेहमी एकमेकांशी संपर्क साधतो तो केवळ भाषेमुळेच. एका पिढीपासून दु स- या पिढीपर्यंत भाषेचा वारसा पोहचविणे म्हणजे सांस्कृतिक संक्रमण होय.

आपली संस्कृती व इतिहास भाषेत सामावलेला असतो. तो इतिहास, संस्कृती लेखक साहित्याचा माध्यमातून सांगत असतात. भाषेच्या विचारविनिमयामुळे परिवर्तन घडवून येत असते. ते परिवर्तन अनेक लेखकांनी घडवून आणले आहे. काही लेखकानी भाषेवर जीवापाड प्रेम केले.

तीला वाढविले. मनमनात तिच्याविषयी गोडी निर्माण केली. मराठी भाषा ही आपल्या हृदयाची भाषा आहे हे बिंबवले. भाषेच्या माध्यमातून क्रांतिकारकत्व सांगितले. सर्वांच्या सुख दुःखात तीला सामावून घेतले. म्हणून ती मोठी झाली. त्या अनेक लेखकांनपैकी कुसुमाग्रज हे एक होते. आपल्या कथा, कविता आणि नाटकाच्या माध्यमातून जनतेच्या मनावर अधिराज्य निर्माण केले. त्याला फक्त ही भाषाच जबाबदार आहे. भाषेने त्यांनाआणि समाजाला पर्यायाने देशाला फार किंमत मिळवून दिली. देशाचे सामाजिक, सांस्कृतिक वैभव खुलविले. त्यांच्या लेखनातील समाजनिष्ठ भाषेमुळेच त्यांचा जन्मदिन 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो.

मराठी भाषा ही राजभाषा म्हणून ओळखली जाते. आजच्या स्थितीत मराठी भाषेची बरीच दुरावस्था निर्माण झाली आहे. ही बाब खरोखरच चिंताजनक आहे. आज मराठी भाषेला एक मरगळ म्हणा किंवा साचलेपणा आला आहे. त्यामुळे मराठी भाषेला आता नवसंजीवनी देणे गरजेचे आहे.

जागतिकीकरण, उदारीकरण आणि मोबाईलमुळे भाषेची प्रचंड मोडतोड होताना दिसत आहे. या सर्व गोष्टींचा विचार आजच्या मराठी भाषा अभ्यासकांनी व अध्यापकांनी करणे आवश्यक आहे. त्यांनी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व इतर क्षेत्रातही सतत जागरूक राहणे गरजेचे आहे. भाषेची मोडतोड होणार नाही म्हणून वाचन, लेखन, भाषण, श्रवण, शुध्दलेखन, शुध्दवाणी, भाषाप्रभुत्व अशा काही गोष्टीकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

जेणेकरून मराठी भाषेविषयी वाचकांच्या मनात आत्मियता निर्माण होईल. तिच्याविषयी गोडी निर्माण होईल. तिचा गौरव होईल. हे काम सतत भाषकांनी करायला हवे. भाषेचे संवर्धन करणे भाषकांचे काम आहे. कारण भाषक म्हणजे साहित्यिक भाषेला साहित्याचा माध्यमातून पुढे पुढे घेऊन जात असतो. भाषा मरत नसते तर भाषक मरत असतो. सुरेश भट म्हणतात..

"येथल्या दरीदरीत हिंडते
मराठी येथल्या वनावनात गुजंते
मराठी येथल्या तरूलतात सजते
मराठी येथल्या कळीकळीत
लाजते मराठी"


**प्रा. डॉ. सतीश मस्के**
मराठी विभागप्रमुख, कर्म. आ. मा. पाटील वरिष्ठ महाविद्यालय, पिंपळनेर ता. साक्री जि. धुळे
मो. ७५०७५ ०४०४६

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ फेब्रुवारी २०२५


## शिवाजी महाविद्यालयात भाषा गौरव दिनानिमित्त बालकविसंमेलनाचे आयोजन

**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड तालुक्यात वाङ्मयीन चळवळ अधिकच जोर धरू लागली आहे. अनेक नवोदित कवी - लेखक सातत्याने लेखन करीत आहेत. या सर्व वाटचालीत शिवाजी महाविद्यालयाचे महत्वाचे योगदान आहे.

संस्थेचे अध्यक्ष मानसिंह पवार , प्राचार्य डॉ. विजय भोसले यांचे पाठबळ वाङ्मयीन उपक्रमांना मिळत आहे.आता मराठी विभाग, ग्रंथालय विभाग, त्रैमासिक तिफण आणि अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे शाखा कन्नड यांच्या वतीने कन्नड तालुक्यातील विद्यार्थी प्रतिभावंताचा शोध घेवून त्यांना लेखन वाचनासाठी प्रेरित करून हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने मराठी भाषा गौरव दिना निमित्त कन्नड तालुकास्तरीय बालकवि संमेलन व ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजय भोसले राहणार आहेत तर उदघाटन बालकवयित्री कु. पुजा चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख उपस्थिती म्हणून कवी प्रविण दाभाडे, अनिता राठोड, शुभदा देवरे यांना निमंत्रित केले आहे.

या कविसंमेलनात तालुक्यातील शालेय विद्यार्थी प्रथमच एवढ्या मोठया व्यासपीठावर कविता वाचन करणार आहेत. त्यामध्ये समृद्धी आव्हाळे, मुक्ता आव्हाळे, समृद्धी जाधव, प्रांजल खैरनार, ईश्वरी शिंदे, सिद्धिका ठोकळ, आदित्य चव्हाण, मंजिरी निळ, संस्कृती साळुंके, सनाया विश्वासे, आदित्य वेताळ, समृद्धी राठोड, मृणाल आहेर, अंजली बारगळ, नंदिनी चव्हाण, चंचल राठोड, समृद्धी चव्हाण आदी बाळ कवी कवयित्री सहभागी होणार आहे.

तालुक्यात प्रथमच हा आगळा वेगळा उपक्रम होत आहे. या कार्यक्रमास सकाळी दहा वाजता विद्यार्थी व काव्यप्रेमींनी सहभागी व्हावे, असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक मराठी विभाग प्रमुख डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे, ग्रंथपाल प्रा. संतोष देशमुख यांनी केले आहे.

## मराठवाडा साहित्य परिषदेने कवी संमेलन

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी कविवर्य कुसुमाग्रजांचा जन्मदिन कविता दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षी मराठवाडा साहित्य परिषदेने निमंत्रितांचे कवी संमेलन आयोजित केले आहे.

हे संमेलन मराठवाडा साहित्य परिषदेच्या नांदापूरकर सभागृहात २७ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी साडेपाच वाजता आयोजित केले आहे.

हे संमेलन साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त सुप्रसिद्ध कवी श्री श्रीकांत देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून छत्रपती संभाजीनगर सह महाराष्ट्रातील युवा कवींना या संमेलनासाठी निमंत्रित करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजी नगर व नजीकच्या परिसरातील सर्व काव्य रसिकांनी या कवी संमेलनास अवश्य यावे असे आवाहन कार्यक्रम समितीचे अध्यक्ष प्राध्यापक हंसराज जाधव यांनी केले आहे.

# लोकशाहीचा पाचवा स्तंभ : स्वयंसेवी संस्था

संसद अर्थात कायदेमंडळ, सरकार (म्हणजे कार्यकारी मंडळ ), न्याय पालिका आणि मीडिया (प्रेस) हे लोकशाहीचे चार आधारस्तंभ आहेत. स्वयंसेवी संस्था (एनजीओ) हा लोकशाहीचा पाचवा स्तंभ समजला जातो. सबंध जगात स्वयंसेवी संस्था करीत असलेल्या कार्यासाठी आणि त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 27 फेब्रुवारी हा दिवस जागतिक स्वयंसेवी संस्था दिवस म्हणून जगभर साजरा करण्यात येतो. हा दिवस पहिल्यांदा 2009 मध्ये साजरा करण्यात आला मात्र त्यांस आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता 2014 मध्ये मिळाली. 'चिरस्थायी भविष्यासाठी तळागाळातील चळवळिंचे सक्षमीकरण' ही यावर्षीच्या जागतिक स्वयंसेवी दिवसाची मुख्य संकल्पना आहे.

'एकविसावे शतक', असे संयुक्त राष्ट्राचे माजी सरचिटणीस कोफी अन्नान यांनी म्हटले होते. स्वयंसेवी स्वयंसेवी संस्थांचे युग म्हणून ओळखले जाईल संस्था म्हणजे अशासकीय संस्था. जागतिक बँकेने केलेल्या व्याख्येनुसार ''लोकांचे दु:ख कमी करण्यासाठी, गरिबांच्या हितरक्षणासाठी, पर्यावरण संवर्धनासाठी, मूलभूत सामाजिक सेवा पुरविण्यासाठी झटणाऱ्या आणि समुदाय विकासाचे कार्य करणाऱ्या संस्था म्हणजे स्वयंसेवी संस्था होत.'' दुसऱ्या शब्दांत सांगायचे म्हणजे, ''स्वयंसेवी संस्था कायद्याने स्थापन झालेल्या असतात आणि त्या शासनापासून अलिप्त राहून काम करतात. सार्वजनिक हितासाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचा उद्देश नफा कमविणे नसतो. सामाजिक न्याय, विकास आणि मानवी हक्कांचे संरक्षण ही स्वयंसेवी संस्थांची मुख्य उद्दिष्ट्ये असतात. स्वयंसेवी संस्थांना शासनाकडून संपूर्ण अथवा अंशत: आर्थिक सहाय्य प्राप्त होते. काही संस्थांना परदेशातील शासकीय तथा अशासकीय यंत्रणेकडूनही अर्थसहाय्य मिळते.

भारतात सुमारे 30 लाखापेक्षा जास्त स्वयंसेवी संस्था कार्यरत आहेत. त्यापैकी सर्वात जास्त उत्तर प्रदेशात आहेत. त्या नंतर महाराष्ट्र, दिल्ली आणि पश्चिम बंगाल यांचा क्रमांक लागतो. ह्या संस्था शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संरक्षण,दारिद्रय निर्मूलन, अपंग व अनाथ कल्याण, जलसंधारण, ग्रामीण व आदिवासी विकास, विधी साक्षरता, अंधश्रद्धा निर्मूलन, पाणलोटक्षेत्र विकास, प्राण्यांचे हक्क, वन्यजीव संवर्धन, वृद्ध समूहाची काळजी, कुपोषण, रस्त्यावरची मुले, आपत्ती व्यवस्थापन, निर्वासित समूहाचे प्रश्न, बालमजुरी उच्चाटन, भ्रष्टाचार निर्मूलन, ग्राहक संरक्षण, मानवी हक्क संरक्षण अशा विविध क्षेत्रात काम करीत आहेत.

कोणत्याही लोकशाही देशात स्वयंसेवी संस्था अतिशय महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात. भारतासारख्या विशाल नि खंडप्राय देशांत सरकार सर्वच स्तरातील जनतेच्या गरजा पूर्ण करू शकत नाही. किंबहुना सरकार त्यांच्यापर्यंत पोहचण्यात अनेक अडथळे येत असतात. अनेक सरकारी योजना, उपक्रम गरजू जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांची मदत होत असते. लोकशाही प्रक्रियेचे पालन करण्यासाठी स्वयंसेवी संस्था आणि नागरी समूह (सिव्हील सोसायटी) यांची भूमिका महत्वाची ठरते. जनता आणि सरकार यांच्यात दुवा साधण्याचे काम स्वयंसेवी संस्था करतात. सरकार जरी जनतेने निवडून दिलेले असले तरी सरकारने घेतलेला प्रत्येक निर्णय हा नागरिकांच्या हिताचा असेलच असे नाही. एखाद्या निर्णयाने अनिष्ट परिणाम घडून येण्याची शक्यता असते. अशावेळी स्वयंसेवी संस्था लोकांमध्ये जाणीव-जागृती करून विचारमंथन घडवून आणते. काही संस्था जनतेच्या हिताविरोधातील निर्णयाला कायद्याच्या चौकटीत राहून आव्हान देतात. तर काही संस्था यात थेट हस्तक्षेप न करता लोकांची मनोभूमिका तयार करून त्यांना सरकारला जाब विचारायला भाग पाडतात. प्रसंगी लोकप्रतिनिधी आणि माध्यमांचीही मदत घेतली जाते.

आपल्या देशात आणि राज्यातही अनेक स्वयंसेवी संस्थांनी समाजिक प्रबोधनासाठी आणि विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे आणि देत आहेत. समाजिक न्यायाचे, स्त्री सक्षमीकरणाचे अनेक कायदे, योजना अशा स्वयंसेवी संस्थांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि हस्तक्षेपामुळे प्रत्यक्षात आल्या आहेत. मात्र 2014 नंतर स्वयंसेवी संस्थांच्या कार्यप्रणालीवर केंद्र सरकारने बारकाईने लक्ष ठेवायला सुरुवात केली आहे. यामुळे काही बनावट संस्थांना चाप बसला,ही चांगली बाब आहे. मात्र तळागाळात एका विशिष्ट ध्येयाने काम करणाऱ्या पण व्यवसायिकतेचा अभाव असलेल्या संस्थांना बऱ्याच अडचणींना समोरे जावे लागत आहे. अनेक संस्थावर विदेशी आर्थिक सहाय्य घ्यायला बंदी आणली आहे. परिणामी अशा संस्थांची आर्थिक बाजू कमकुवत झाली आहे. लोकशाहीचा पाचवा स्तंभ म्हणून देशात स्वयंसेवी संस्थांची भूमिका फार महत्वपूर्ण आहे !




**प्रा. डॉ. प्रवीण घोडेस्वार**

सामाजिक शास्त्रे व मानव्य विद्या शाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

मो. ९४०३७ ७४५३०



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २७ फेब्रुवारी २०२५

# सातपाटील कुलवृत्तांत कादंबरीतील स्त्रीविश्व




भारतीय इतिहासाने पुरुषी व्यवस्थेला सतत झुकते माप देऊन स्त्रियांचे करता येईल तेवढे अवमूल्यन केले आहे. तिचे प्रत्येक ठिकाणी दुय्यम असणे अधोरेखित करणारी पुरुषसत्ताक व्यवस्था सोयीनुरूप आपले डाव- प्रतिडाव टाकत आली आहे. आजही स्त्रियांच्या नैसर्गिक अधिकारांचा, तिच्या माणूस असण्याचा आपण सन्मान करतो. असे भाषणांमधून खूप लोक बोलताना दिसतात परंतु दाराआड घरात अरेरावी करतात. कुटुंबात तिचे उदात्तीकरण आणि सामाजिक पातळीवर वस्त्रहरण, स्वत्वहरण असे दुहेरी षडयंत्र तिच्याभोवती रचून तिचा मानवी स्वर कुंठीत करणारी, स्त्री ही भोगदाशी समजून स्त्रियांकडे मात्र सोयीस्कर डोळेझाक करणारी इथली व्यवस्था डोळ्याआड करता येत नाही. स्त्रियांच्या कर्तुत्वाचा स्वतंत्र इतिहास लिहिला गेला नाही हे सुद्धा एक वास्तव आहे. इतिहास लेखन करणारे इतिहासकार आणि त्याला मान्यता देणारे पंडित दोन्हीही एका शोषक कुळातले आहेत. त्यांनी त्यांच्या सोयीने पाहत आपले प्रस्थ सामान्यजणांवर लादले आहे. ज्यांनी याबाबत प्रश्न विचारले, विषमतेवर आधारलेल्या व्यवस्थेचे पितळ उघडे पाडले त्यांचा खून करण्यात आला. चक्रधर, महात्मा बसवेश्वर, संत तुकाराम ही ठळक उदाहरणे आहेत. या वर्णवर्चस्वप्रणित दहशतीचा इतिहास एकदा तपासून पाहायला हवा. स्त्रीचे प्रचलित इतिहासात नगण्य असणे स्वच्छपणे समोर येते. एकरेषीय इतिहासाला थोडेसे बाजूला सारले तर मध्ययुगीन काळात स्त्रियांबाबत एक आशादायी चित्र होते. हे वास्तव 'सातपाटील कुलवृत्तांत' ही कादंबरी रेखाटते.

**सातपाटील मधील स्त्रीविश्व :**

'सातपाटील कुलवृत्तांत' कादंबरी मधील स्त्रियांचे अस्तित्व अधिक उठून दिसते. कारण या स्त्रिया आपल्या माणूस असण्याच्या जाणिवेचा ठाम उच्चार करतात, आपले स्त्रीत्व जाणून घेऊन स्वतःच्या आयुष्याची दिशा स्वतःच्या नियम वाटेवर मुक्रर करतात. पुरुषीसत्तेने लागलेल्या मालकी हक्काच्या रूढीवादी परंपरांना छेद देतात. कारण या स्त्रिया आपले दुय्यम स्थान मान्य करून मूकपणे वावरत नाहीत तर त्या प्रेरक म्हणून अवतरतात त्यांची कर्तबगारी ही त्यांच्या आसण्यामध्येच एकवटल्याची प्रचिती कादंबरी वाचताना येते. या कादंबरीतील पुरुषांची कर्तबगार असणेच मुळात स्त्रियांच्या असण्यावर अवलंबून असलेले दिसते. कादंबरीतील पुरुष कायम काठावर उभा राहून वाट नेईल तिकडे जाणारे, अंगभूत शहाणपणाचा अभाव उघड करत वावरणारे, सामाजिक, कौटुंबिक परिघावर आपल्या भावभावनांचे नियमन करण्यात आणि आपल्या एकाकीपणाचे व्यवस्थापन करण्यात असफल झालेले दिसतात. त्यामुळे कादंबरीचे शीर्षक 'सातपाटील कुलवृत्तांत' असे पुरुष प्रधान असले तरी त्यामधील खऱ्या नायक स्त्रियाच आहेत. सबंध कादंबरीवर स्त्रियांचाच वरचष्मा आहे.

देवनाथच्या तोंडून यासंबंधीचे वर्णनही आले आहे. "सातपाटील कुलवृत्तांत हा खेळ मांडताना मी शीर्षके भलो पुरुषांच्या नावे दिली असतील; पण प्रत्यक्षात सारा खेळ खेळणाऱ्या स्त्रियाच आहेत. असे मला दिसते. प्रेमभावना, नातेसंबंध, स्नेहभाव ही सारी भूमितत्वाच्या अखंड नर्तनाची वेगवेगळी रूपे होत. स्त्री पृथ्वीचा अंश होय. ती पुन्हा पुन्हा स्त्री निर्माण करते आणि तीच पुरुष निर्माण करते. तिला तिच्या असण्यासाठी, तिच्या असण्याचे नवे नवे उन्मेष पुन्हा पुन्हा प्रकट करण्यासाठी पुरुष गरजेचा असतो म्हणून ती त्याला निर्माण करते." देवनाथसह सातपाटील कुळीतले सगळेच पुरुष या स्त्रीत्वापुढे, तिच्या ठायी असलेल्या नवनिर्माण आणि ध्वस्त करण्याच्या भूतत्वीय शक्तीपुढे लीन झालेले दिसून येतात. देवनाथच्या वरील मतावर शिक्कामोर्तब करणारे मत शंभूरावाची पत्नी तेजबाईच्या तोंडून येते. "गडी मेला तर एकलाच मरतो. त्याच्या पाठी बाई कशीयपण रांडा रोटा करत दिवस काढिती पण बाई मेली की ते सगळंच घेऊन मरती. गड्याला सुदिक घेऊन मरती. त्याला जिता असून दिवस काढता येत नाय. हे तुला समजत नाही. पुरुषाला आनभाव नसतो, बाई ते घेऊनच जल्माला येते." तेजबाई पुरुषाच्या परावलंबी असण्याबद्दल त्याच्यापुरुष म्हणून असलेल्या दुर्बलतेबद्दल स्पष्टपणे बोलण्याचे धाडस ठेवते. तेजबाई सारख्या इतर अनेक स्त्रिया पुरुषाचे स्खलनशील असणे, पुरुष म्हणून त्याचे मलुल होत जाणे, मर्यादांनी वेढलेले असणे, विझून जाणे हे उघड झाल्यावर अधिक स्पष्ट, मोकळ्या होत जातात. त्यांच्या बोलण्यात स्वभावात आक्रमकतेच्या छटा प्रकटू लागतात अखेर त्या बंधमुक्त होतात. त्यांचे हे मुक्त होणे पुरुषाच्या जगण्या मारण्यात उजळून निघते. पुरुष तेवढे सहजासहजी बंधमुक्त होत नाहीत. उलट त्यांचे असणे काळवंडत जाते. स्त्रीच्या आक्रमकतेला तोंड देताना पुरुष काहीसे गोंधळलेले दिसतात, हतबल झालेले दिसतात.

झमबाईचे लग्न खोपडे पाटलांच्या नातवासोबत व्हावे असे जानरावला वाटते. खोपडे पाटलाच्या प्रस्तावावर तो अनुकूल असतो. जानरावची बायको सरूबाई आपल्या मुलीसाठी राजकुमाराचे स्वप्न पाहते, त्यातच जगत असते. तिने पाटलाच्या प्रस्तावाच्या अनुकूल विचार करावा, स्वप्नातून बाहेर पडून वास्तव स्वीकारावे यासाठी जानराव प्रयत्न करतो ; पण त्यात तो सपशेल अपयशी ठरतो उलट सरुबाईच्या एका वेगळ्या रूपाला त्याला सामोरे जावे लागते. " मी तुला आधीच सांगितल्यालं हाय जानराव! त्याला प्रचंड धक्का बसला. त्याची बोलतीच बंद झाली. मपल्यासंगती लग्न करून त्वा मपलं वाटुळं क्यालं, ते कैक झालं." असे स्पष्ट शब्दात नवऱ्याला कार्य करण्याची हिंमत सरूबाई ठेवते.

स्त्रियाच सर्व कथांचे नियंत्रण आणि संचालन करतात. निर्णय प्रक्रियेत पुरुषांपेक्षा अग्रस्थानी असून प्रसंगी त्यांच्यात कठोरताही अनुभवास येते. जगण्याच्या कोलहलात त्या अधिक समरसून सहभागी होतात आणि इतरांनाही त्या आत ओढून घेतात. त्यांचे स्त्रीत्व पुरुषांना उभे करते, कृतीप्रवण बनवते, लौकिक मिळवून देते, समाजाच्या केंद्रस्थानी उभा राहण्यासाठी पुरुषांना उदयुक्त करते तथा कादंबरीतील बहुतांश पुरुष स्वतःकडून आणि जीवनाकडून फारशा अपेक्षा करत नाहीत. त्यांना जगण्याच्या प्रवाहात ओढून आणेपर्यंत ते स्थितिशील जगणे अंगीकारून विशिष्ट चाकोरीत राहणे पसंत करतात. कादंबरीतल्या सगळ्या पुरुषांना आपल्या आत असलेल्या शक्तीची, कर्तबगारीची पुसटशी जाणीवही असलेली दिसत नाही. ते काहीसे गोंधळलेल्या मनस्थितीचे भ्रमिष्ट, भयाने पछाडलेले आहेत. थोडक्यात त्यांच्या पुरुषीपणाला स्त्रीचा टेकू असल्याशिवाय अर्थ प्राप्त होत नाही. या कादंबरीत पुरुषांच्या पाठीमागे स्त्री ठामपणे उभी आहे, म्हणूनच पुरुषाच्या असण्याला अर्थ प्राप्त होतो. त्यांच्या कर्तबगारीला सामाजिक चेहरा प्राप्त होतो, त्यांच्या कर्तुत्वाचा काही एक सारांश हाती लागतो. 'सातपाटील'मधील पुरुषांवर स्त्रीचा वचक आहे. हा वचक कधी कधी उघड तर बऱ्याचदा अदृश्य स्वरूपाचा किंवा त्या पुरुषांनी स्वतःवर लादून घेतलेला आहे. त्यामुळे कदाचित आयुष्याच्या शेवटी विमनस्कता, विरक्ती ठसठशीतपणे पुढे येते. स्वतःपासून, जगण्यापासून तुटत जाणे, मलूल पडत जाणे, स्वतःभोवती एक कोश विणणे जणू या पुरुषांची नियतीच आहे.

कादंबरीत पुरुषाच्या तुलनेने स्त्रिया अधिक प्रगल्भ, व्यवहारचतुर, जगण्याचा समतोल टिकून ठेवणाऱ्या असून त्या सहजासहजी पराभव स्वीकारत नाहीत. कोलमडून पडत नाहीत. त्या शेवटपर्यंत अढळपणे उभ्या असलेल्या दिसतात. मार्ग असतातच यावर विश्वास ठेवणाऱ्या अन् मार्ग पायदळी तुडवणाऱ्या स्त्रिया कादंबरीच्या नायिका आहेत. पहिल्या भागात येणारी रोहिणी देशमुखीन नवऱ्याच्या पलायनानंतर सगळे निर्णय घेऊन वांबोरी या देशमुखीच्या गावी जाऊन राहते. गावचा कारभार नेटाने करते पण गावातले लोक जेव्हा नवऱ्याचे म्हणजेच केशीराज एडके यांचे देऊळ बांधायचा निर्णय घेतात. तेव्हा मात्र ती अस्वस्थ होते. कारण नवऱ्याचे तृतीयपंथी असणे तिला माहीत असते. म्हणून ती वांबोरीतून निघून जाण्याचा निर्णय घेते. हा निर्णय घेताना ती सासऱ्याला सुद्धा जुमानत नाही. "इथून बाहेर पडताना सुद्धा त्यांना कळेल अशी व्यवस्था मी करीन. तो माझाच आणि केवळ माझ्याच निर्णय असेल." ती स्वतंत्र प्रज्ञा असलेली नैतिक अनैतिकतेच्या शिड्या उतरलेली, चांगल्या वाईट याची चव चाखलेली आहे. तिच्या मतांना जाणिवांचे अस्तर आहे. 'मी जे जे करीन त्याचा चेहरा तू असशील. ते तूच करतो आहेस असे दुनियेला दिसेल' अशी पुढील जगण्याची दिशा निश्चित करत साहेबरावाला धीर देणारी आर्यना. पानिपतच्या लढाईत वाचलेल्या दशरथला जखमी अवस्थेत अफगाणिस्तानला झोरावर समजून नेले जाते. काही काळानंतर तो आपला पती नाही हे आफियाच्या लक्षात येते आणि ती अनेक पर्यायांमधून त्याला स्वीकारण्याचा पर्याय मार्ग निवडते. पुढचे आयुष्य मार्गी लावण्याचे ठरवते त्यातूनच दशरथला अफिया 'तुला मला सोबत घेऊन जावे लागेल' असा आदेश सोडते.

या कादंबरीत पठारे यांनी स्त्रीविश्व फारच ताकतीने उभे केले आहे. विशेषतः ज्या काळाच्या पार्श्वभूमीवर ही स्त्री पात्रे लेखकाने उभी केली आहेत ते एक प्रकारचे आव्हानच होते. या स्त्री पात्रांची जाणीव-नेणिवेच्या पातळीवरची परिपक्वता, स्वीकार आणि नकारातील नैसर्गिक स्पष्टता प्रचलित लोकधारणांना हादरे देते. आपल्या अंगभूत शहाणपणाचे दर्शन घडवून देताना या स्त्रिया रुढ समाज धारणांच्या छातीवर बसून स्वाभिमानाने उभ्या राहतात. आपल्या स्त्री असण्याचे किरकोळीकरण करण्याचे पुरुषीसत्ताक व्यवस्थेचे रुढीवादी समाजाचे सगळेच डावपेच उलथवून लावतात. त्या असे करू शकतात कारण त्या स्वतःचे माणूस असणे ठळक करत नेतात, स्वतःच्या लैंगिक जाणीवा जानतेपणाने स्वीकारतात आणि त्या बाबतीत मुक्त स्वातंत्र्य त्या त्या काळात घेतात. आपल्या जगण्याचा पैस वाढवतांना त्या इतरांच्या अहंभावाला, न्यूनाला आणि व्यक्ती म्हणून असणाऱ्या त्यांच्या अवकाशाला धक्का लागणार नाही याची दक्षताही घेतात. पुढे जे आणि जसे आयुष्य चालत येते त्याला स्वीकारण्याची आणि 'स्व' चे मुक्तपण जपत विनातक्रार निभावून नेण्याची जन्मजात क्षमता या स्त्री पात्रांमध्ये आहे. रोहिणी, सरस्वती, आर्याना, गीता, अफिया, उल्फी, देऊबाई, महक, कुंजपुऱ्यातील तिलाराम शिंपी दुकानदाराची बायको अशा अनेक स्त्रिया आहेत. ज्या स्वतःच्या जगण्याचा संकोच होऊ देत नाहीत. व्यक्ती म्हणून असलेला स्पेस त्या घेतात आणि वास्तवाशी जीवाच्या करारानेे भिडतात. पराभवाच्या अंतिम क्षणी तहाचा जुगार खेळून अल्लाद बाहेर पडतात. रोहिणी सहस्रसेनाच्या प्रेमात पडते. त्याजवळकीतून तिला गर्भ राहतो आणि त्याचवेळी राजा बिंबदेव सहस्रसेनाला मोहिमेवर पाठवतो. रोहिणी त्याची खूप वाट पाहते पण सहस्र सेनाच्या परतीच्या शक्यता विरून जाता. अशा बेचैन अवस्थेत ती पोटातल्या गर्भासहित स्वतःला संपवण्याच्या निर्णयापर्यंत पोहोचते. पण त्याचवेळी तिला केशीराज एडकेसाठी मागणी घातली जाते. तिचे वडील स्वतःचा होकार कळवतात. रोहिणीचा नाईलाज होतो. मुलाशी भेटण्याचा प्रस्ताव ती वडिलांपुढे ठेवते पण भेटीसाठी परवानगी मिळत नाही योगायोगाने मुलगाच रोहिणीला भेटू इच्छितो दोघांची भेट होते. तो तिला आपल्या तृतीयपंथी असण्याची कबुली देतो."मला स्त्रीशी संसार करणं शक्य नाही. मी कोणत्याही स्त्रीला अपेक्षित सुख देऊ शकत नाही. त्याच्या या लैंगिक दुर्बलतेच्या वास्तव कबुलीनंतर तीही स्वतःची अडलेली अवस्था सांगून, मला तुमच्या प्रस्तावात जगण्याचा रस्ता दिसतो." म्हणत लग्नाला नकार देण्याऐवजी होकार देते. तत्कालीन समाज व्यवस्थेत असणाऱ्या सगळ्या नीती नियमांना पायदळी तुडवून तिने जगण्याचा पर्याय निवडला.

रोहिणीने जातिबाहेरच्या माणसाशी प्रेम केले. लग्नापूर्वी त्याच्याशी स्वेच्छेने लैंगिक संबंध प्रस्थापित करून पोटात गर्भ वाढवला आणि शेवटी मृत्यूच्या अपराधग्रस्त छायेत जगण्याचा रस्ता म्हणून पौरुषीहिन माणसाशी लग्न करून आत्महत्या टाळली,भ्रूणहत्या टाळली. समाजाच्या सगळ्याच प्रचलित नैतिकतेच्या चौकटी ओलांडणारी रोहिणी ही व्यक्तिरेखा जातीव्यवस्थेला नकार देऊन योनिशुचितेच्या कल्पनांना पायदळी तुडवून जगण्याचा स्वीकार करते. तिने मनाला नकार देऊन जगण्याचा स्वीकार केला. विशेष म्हणजे तिने आपल्या लैंगिक जाणीवांना प्रतिसाद देत स्वतःच्या मुक्त अवकाशाचा संकोच होऊ दिला नाही. केशीराज एडके यांच्या लैंगिक दुर्बलतेकडे हीनभावाने न पाहता त्याचा स्वीकार करून समाजाच्या लेखी त्याच्या पुरुष असण्याला मान्यता मिळवून दिली. पुढे तो अल्लाउद्दीन खिलजीच्या हस्तक असलेल्या किन्नराबरोबर पळून गेला आणि गावकऱ्यांनी केशीराज एडके यांची देऊळ बांधण्याचा प्रस्ताव मांडला त्यावेळी ती अस्वस्थ झाली पण त्याचे तृतीयपंथी असण्याबद्दलचे वास्तव तिने जगजाहीर केले नाही. उलट त्याच्या तृतीयपंथी असण्याचे आणि समाज लेखी तसे न दिसू देण्यापायी होणाऱ्या त्याच्या कुचबंनेकडे ती मानवतेच्या चष्म्याने पाहते. तिच्या मनात त्याच्या तृतीयपंथी असण्याच्या हिनभावापेक्षा कारुण्याची भावनाच अधिक आहे. रोहिणीने जगण्याच्या सगळ्या रसांना नैसर्गिकपणे प्रतिसाद दिला. त्याची किंमतही मोजली पण जगण्यावर भरभरून प्रेम केले.

सरस्वती आणि गीता या स्त्री व्यक्तिरेखा काहीशी वेगळी वाट निवडतात. सामाजिक, कौटुंबिक दाब आपला निसर्गदत्त अधिकार वापरून नाकारतात. आपल्याला लैंगिक कल जाणून 'मला पुरुषाच्या सहवासाची भावनाच नाहीये' अशी प्रांजळपणे कबुली देणारी सरस्वती समाजाच्या सामाजिक संतुलनाच्या युक्तीवादी दबाव तंत्रापेक्षा आपला आपला आवाज ऐकून आपल्या वैयक्तिक स्वातंत्र्याला प्राधान्य देते. आपल्या लैंगिक क्षमतांना जोखून तसा प्रतिसाद देणाऱ्या सरस्वतीपेक्षा सोळाव्या शतकाच्या कालखंडात समाजातल्या पार्श्वभूमीवर चित्रित झालेली गीता सरस्वतीचे पुढचे एक पाऊल वाटते. ती म्हणते, "माझं लग्न झालं असतं तर फार बिघडलं असतं. असं आता माझ्या लक्षात येतंय. तिडकेच्या पोरानी मला नकार देऊन माझ्यावर फार उपकार केलेत. ते झालं असतं तर मला पिचत जगाव लागलं असतं. आणि त्याच्या आयुष्याचं नुकसान झालं असतं. मला संसाराची इच्छाच नाहीये. हे मला आता कळतं. हजारात किंवा लाखात एखादी मी असेन; पण आहे. मला पुरुषाच्या सहवासाची चाहच नाही. त्याच्याशिवाय मी फार सुखात आहे." असे म्हणून आपल्या लैंगिक वास्तवाला उजागर करतेच पण ज्या समाजात आपल्याला जगायचा अवसर त्या नाही, त्या समाजालाही ती नाकारते. एवढेच नाही तर एडकेच्या मुलाने दिलेल्या नकाराकडे स्वतःच्या जाणीवांच्या प्रकाशात पाहते.

पितृसत्तेच्या,पुरुषीसत्तेच्या भांडवली मानसिकतेला काही स्त्री पत्राच्या माध्यमातून लेखकाने छेद दिला आहे. आबाराम कोल्हाटी विधवा मराठा स्त्रीला फुस लावून तिच्यासोबत संसार थाटतो. पण नंतर मात्र त्याची नियत फिरते तो शरीर विक्रयासाठी तिच्यावर दबाव टाकू लागतो. तिला मात्र सक्तीचा हा व्यवहार रुचत नाही कारण तिने त्याच्यावर मनापासून प्रेम केलेले असते. याच सक्तीतून तिच्यावर हात उगारतो ती रात्रीच घर सोडून निघून जाते. पुढे हाच मालकी हक्काचा प्रयोग मुलगी उल्फीवरही करतो. ती बापाच्या या भ्रष्ट भांडवली मानसिकतेला कंटाळून पिराजीला म्हणते, "तु मला इथून उचल. माझा बाप भामटा आहे मला तुझ्यासोबत राहायचे आहे, नेतोस मला.? कुठल्याही जाती-धर्माची स्त्री असली तरी तिला स्वतःची एक मर्जी असते. तिची काही एक निवड असते. त्यामुळे कोणीही त्या मर्जीची पायमल्ली करू शकत नाही हेच उदाहरण लेखकाने पुढे ठेवले आहे. याचे अजून एक बोलके उदाहरण म्हणजे बंकट भोसलेची कुंजपुऱ्यातील प्रेयसी. ती बंकट बरोबर पराभूत रोड लोकांच्या वस्तीत जाते. तिथे सगळे पुरुषच असतात आणि ती एकमेव स्त्री असून तिथल्या परिस्थितीचा अंदाज घेऊन त्या पुरुषांना म्हणते, "मी फक्त बंकटची. त्याला माझा इलाज नाही. पण तुमची व्यथा मला कळते. मी बाया आणते, तशी कोशिश करते. तुम्ही त्यांना प्रेम द्या. त्यांच्या संमतीने वागा. त्यांना वाटून घ्या. आपल्या सगळ्यांचे संसार चालतील इतक्या बाया आणण्याची जबाबदारी माझी. मी हे इतके तुमच्यासाठी करीन. फक्त बंकट माझा पुरुष असेल याची मला हमी द्या. मी हे जरा जास्तीचे मागते आहे, तरीपण माझे ऐका कारण तुम्ही हे मान्य नाही केले तर मीही जाईन" इथेही तिच्या संमतीला, तिच्या स्त्री म्हणून असलेल्या अधिकाराला कोणीही आव्हान देऊ शकत नाही. ती फक्त स्वतःची बांधील असल्याचा ठाम स्वर ऐकते.

याउलट स्त्री म्हणून असण्याला, सामाजिक नियमाच्या चक्रव्यूहात हरवून जाऊ न देता आपले जगणे स्वतःच्या हिमतीवर उभ्या करणाऱ्या अनेक स्त्रिया लक्ष वेधून घेतात. जगण्याच्या उत्साहात आपले अस्तित्व उजळून निघावे यासाठी पुढाकार घेतात. अशावेळी सामाजिक बंधनाचे सीमोल्लंघन करतात. यात सगळ्या जाती धर्माच्या आणि सामाजिक स्तरातील स्त्रियांचा समावेश आहे. वयाच्या अकराव्या वर्षी स्टुअर्ट लेसिंग या इंग्रज पोलीस अधिकाऱ्यांसोबत भीमबाई पळून जाऊन संसार थाटते. 'तुम्ही मला आवडता. तुम्ही मला ठेवा.' कुठलाही आड पडदा न ठेवता शंभूरावाला मागणी घालणारी देऊबाई सुद्धा याच वृत्तीची. 'इतके दिवस आपण सोबत होतो. एका खोलीत राहिलो. तु माझ्याशी येण्याशी कोशिश केली नाहीस हे काय मी तुझ्या मोठ्या मनाचे लक्षण मानत नाही. तुला तुझ्या कमरबंधाची अधिक काळजी होती.' असे दसरतच्या मोहवृत्तीचे पितळ उघड पाडणारी महक आणि अशा कितीतरी स्त्रिया त्यांच्या स्वतंत्रवर्तीचे दर्शन घडवून देणाऱ्या आहेत.

या सगळ्या स्त्रिया आहे त्या परिस्थितीशी जुळवून घेत परिस्थिती बदलण्याची संधी हेरून त्या संधीला आपल्याकडे वळते करून आयुष्याला इच्छित आकार देतात. जगण्याच्या चिंचोळ्या वाटेला प्रशस्त महामार्गात परावर्तित करण्याची अचाट बुद्धिमत्ता या स्त्रियांच्या ठाई आहे. असे असले तरी त्या टोकाच्या महत्वकांक्षी नाहीत. सन्मानाने जगता येईल अशी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली की त्या तृप्त होतात. आत्मसमर्पणातले सौख्य अनुभवतात. त्या संघर्ष करतात. म्हणून जगण्याच्या कोलहलात घट्ट पाय रोवून उभ्या आहेत. जगण्याच्या आघाडीवर त्या स्वतःला सिद्ध करतात. तडजोड म्हणजे पराभव नाही हे सूत्रही वाचकाच्या मनावर बिंबवतात. स्वतःला पणाला लावतात. स्वतःचे डाव स्वतः खेळतात. म्हणून पराभवाच्या छायेतही त्यांची प्रज्ञा त्यांची साथ सोडत नाही. हे जरी खरे असले तरी शोषित स्त्रियांचे एक समांतर अधोविश्वही या कादंबरीत चित्रित झाले आहे. कुटुंबासाठी सबंध आयुष्य वेचणारी काळीआजी कष्ट प्रतिमा म्हणून वाचकाचे विचारविश्व व्यापून टाकते. समिंदरा आणि तुळसाबाई या दोन स्त्रिया कादंबरीच्या पटावर दीर्घकाळ राहतात पण इतर व्यक्तींच्या अस्तित्वामुळे त्यांचा एक व्यक्तिरेखा म्हणून विकास होऊ शकला नाही. व्यक्तिरेखा म्हणून त्यांचे असणे फारच नगण्य राहते. त्यांचे जगणेच त्यांच्या असण्यासहित हरवून जाते. हे असे का? या प्रश्नाने अस्वस्थ व्हायला लागते.

**समारोप :**

कादंबरीत आजच्या परिस्थितीच्या तुलनेने अधिक लोकशाहीवादी वातावरण आहे. त्यामधील समाज सर्वसामान्य माणसाच्या व विशेषत्वाने स्त्रियांच्या वैयक्तिक निवडीमध्ये हस्तक्षेप करत नाही. तिच्या स्त्री म्हणून असलेल्या अस्तित्वाला, तिच्या अंगभूत क्षमतांना, तिच्या नैसर्गिक न्यूनभावाला, दौर्बल्याला मान्यता देतो. स्त्रियांचे अधिकार मान्य करणारा समाज कादंबरीत अवतरला आहे. ही घटना आजच्या पार्श्वभूमीवर अर्थपूर्ण ठरणारी आहे. तथापि आपल्या अस्तित्वाच्या मुळाशी, मानव प्रजातीच्या मुळाशी असलेले, पुरुषप्रधान संस्कृतीच्या मुळाशी असलेले स्त्रीत्व आणि तिच्या अनुषंगाने असलेला मानवी समाज त्यांची मानवी संस्कृतीची, मानवी समाजाची आणि एकूणच मानवी वंशाची मूळ असल्याचा विचार या कादंबरीच्या मुळाशी एकवटलेला आहे.



**बापुराव भास्कर वऱ्हाडे**
**संशोधक विद्यार्थी**
**मराठी भाषा व वाङ्मय विभाग.**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर**
**मो. ८४८४०८८४८४**